पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या साररव्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार – 98 23 75 17 76

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो – अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३०० वा ● शनिवार, ता. ३ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

रयत समाचार पोर्टेल
Scan QR Code
रयत समाचार चॅनल
Scan QR Code
इंग्रजी रयत समाचार वाचण्यासाठी
Scan QR Code

# ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला नेतृत्वाची संधी – मुख्यमंत्री फडणवीस

## ‘एआय’ तंत्रज्ञान शिक्षणासाठी नवी मुंबई येथे एज्युकेशन सिटी उभारणार

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

जागतिक स्तरावर मनोरंजनक्षेत्रात ‘एआय’चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. येत्या काळात नवी मुंबई येथे ‘एआय’ तंत्रज्ञानची शिक्षणनगरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे आता ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्राचे जागतिक नेतृत्व करण्याची संधी भारताला मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. वेव्हज परिषदेदरम्यान महाराष्ट्र पॅव्हेलियन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वेव्हज परिषदेसारख्या एका व्यासपीठाची जागतिक पातळीवर गरज होती. ही गरज ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहिल्या वेव्हज परिषदेचे आयोजन केले आणि त्याचे यजमानपद महाराष्ट्राकडे दिले राज्यासाठी ही एक मोठी संधी आहे. वेव्हज परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने काही अत्यंत महत्त्वाचे सामंजस्य करार (MoUs) केलेले आहेत. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा, एनएसईने (NSE) वेव्हज निर्देशांक सुरू केलेला आहे. ४३ कंपन्या, या दृकश्राव्य क्षेत्रातल्या आहेत, या कंपन्यांचा निर्देशांक सुरू झालेला आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करत आणि एकूणच फायनान्शियल



इकोसिस्टीम तयार करण्याकरिता हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचललेले आहे. हा वेव्हज इंडेक्स म्हणजे वेव्हजच्या यशामधला एक मुकुटमणी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. ऑस्ट्रेलिया आणि न्यूयॉर्क या दोन जागतिक विद्यापीठांसोबत आज सामंजस्य करार केल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत, परदेशी विद्यापीठांना देशामध्ये त्यांचे केंद्र उघडण्याची परवानगी मिळाली असून नवी मुंबई इथे सिडकोच्या पुढाकाराने एज्युसिटी उभारण्यात येणार आहे. या एज्युसिटीमध्ये जागतिक दर्जाची १० ते १२ विद्यापीठे आपले कॅम्पस सुरू करणार आहेत. त्यातील दोन विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात आला. सुरुवातीला दीड हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. पण भविष्यात ही गुंतवणूक वाढत जाणार आहे. आणखी तीन महत्त्वाच्या विद्यापीठांशी चर्चा सुरू आहे. देशातले जागतिक विद्यापीठ एकत्र असलेले पहिले कॅम्पस नवी मुंबईमध्ये सुरू होत आहे. यासोबत प्राइम फोकससोबत ( Prime Focus) सामंजस्य करार करण्यात आला आहे, ज्याच्यामध्ये प्राइम फोकस एक फिल्मसिटी या ठिकाणी तयार करणार आहे, ज्यामध्ये जवळपास ३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून किमान १० हजार लोकांना रोजगार मिळेल. ‘एआय’ (AI) पॉवर आणि जगातली उत्तम तंत्रज्ञानही त्या ठिकाणी असणार आहे. पनवेल येथे चित्रपट सृष्टी उभारण्यासाठी गोदरेज सोबतही दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. एकूण ८००० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### न्यायालयाने तपास अधिकाऱ्याच्या कामकाजावर दिली स्थगिती

# ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा कोर्टात युक्तिवाद

**औरंगाबाद । प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सोमनाथ सुर्यवंशीच्या आईने राज्य सरकार विरोधात दाखल केलेल्या याचिकेची दुसरी सुनावणी पार पडली. यामध्ये न्यायालयात झालेल्या महत्त्वाच्या सुनावणीत, शासनाने नेमलेल्या तपास अधिकाऱ्याच्या भूमिकेबाबत गंभीर चर्चा करण्यात आली. संबंधित तपास अधिकाऱ्याने २८ आरोपींना नोटीस बजावून, चौकशीत त्यांनी काय बोलले पाहिजे? हे नमूद केल्याची बाब ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली व ही निष्पक्ष चौकशी नसल्याचे मांडले. यामुळे चौकशी प्रक्रियेत निष्पक्षतेचा अभाव असून, ती दबावाखाली केली जात असल्याची बाब ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयासमोर मांडली.

मा. न्यायालयाने ही मागणी मान्य करत, संबंधित तपास अधिकाऱ्याच्या कामावर स्थगिती (Stay) दिली आहे. तसेच, त्यांनी कोणताही निर्णय घेऊ नये वा कोणताही चौकशी अहवाल सादर करू नये, असा स्पष्ट आदेश कोर्टाने दिला आहे. स्थापन करण्याबाबत निर्णय,



**आम्हाला न्यायालयाकडून न्यायाची अपेक्षा आहे. बाळासाहेब आंबेडकर हे आमच्यासाठी लढताय. त्यांच्यावरच आमचा विश्वास आहे. मला कायद्यातील काही कळत नसले तरी बाळासाहेब आंबेडकर यांना सर्व कळतं आणि ते जे करताय ते योग्यच आहे.**

विजयाबाई सूर्यवंशी (शहिद सोमनाथ सूर्यवंशीच्या आई)


### सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण

न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्याचा अहवाल आल्यानंतर काय निर्णय घ्यावा? याबाबत कायद्यात अस्पष्टता आहे.

याविषयी देखील पुढील सुनावणीला चर्चा होणार असल्याचे ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले. माननीय न्यायालयाने सरकारने नियुक्त केलेल्या चौकशीला स्थगिती दिली आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी युक्तिवाद केला की, ही चौकशी फॉरेन्सिक पोस्टमार्टम अहवालाच्या विरोधी दिशेने चालली आहे. ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी न्यायालयाला सांगितले की, सरकारने नियुक्त केलेली चौकशी सोमनाथ सूर्यवंशी यांचा कोठडीत झालेला मृत्यू श्वासोच्छवासाच्या समस्येमुळे झाल्याच्या दिशेने नेली जात होती. ॲड. प्रकाश आंबेडकर चौकशीतील दिशाभूल व पूर्वग्रहदूषित तपास न्यायालयाच्या लक्षात आणून दिला. या प्रकरणी पुढील सूनवाई ८ मे २०२५ होणार आहे.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१– माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२– वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

# संघर्ष, श्रम आणि समृद्धी यांचा संगम म्हणजे महाराष्ट्र दिन



१ मे हा दिवस महाराष्ट्रासाठी केवळ एक १ तारीख नाही तर एका दीर्घ लढ्याच्या यशाची आठवण आहे. १९६० मध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या माध्यमातून भाषिक, सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेच्या आधारावर हे राज्य निर्माण झाले. त्याच दिवशी जागतिक कामगार दिन साजरा होतो, ज्यातून श्रमिकांच्या योगदानाला मान्यता मिळते. महाराष्ट्र हा देशाच्या प्रगतीचा कणा आहे. इथल्या उद्योगधंद्यांनी, शिक्षणसंस्थांनी, शेती आणि व्यवसायांनी राज्याला आर्थिकदृष्ट्या बळकट केले आहे. देशाच्या दरडोई उत्पन्नामध्ये सर्वाधिक योगदान देणारे राज्य म्हणून महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. मुंबईसारखे आर्थिक केंद्र, पुण्यासारखे शैक्षणिक आणि आयटी हब, नागपूरसारखे लॉजिस्टिक केंद्र हे प्रगतीचे स्तंभ आहेत. महाराष्ट्र संस्कृती, वाणिज्य आणि स्थापत्यकलेचा केंद्रबिंदू होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून आत्मसन्मान जागवला. संभाजी महाराज, शाहू महाराज, बाजीराव पेशवे यांसारख्या योद्ध्यांनी राज्यसंस्थेला मजबूत केले. याच महाराष्ट्राने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांच्यासारखे समाजसुधारक दिले, ज्यांनी शिक्षण, समानता आणि सामाजिक न्यायाचा पाया घातला. स्वातंत्र्य चळवळीत लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव बळवंत फडके, चापेकर बंधूपासून अनेकांनी देशासाठी झुंज दिली. ही परंपरा महाराष्ट्राच्या रक्तात आजही भिनलेली आहे. महाराष्ट्रात कामगार चळवळदेखील तेवढ्याच ताकदीने राबविली गेली. मुंबई तर अनेक वर्षे या चळवळीचे केंद्र होते. इतर राज्यांच्या तुलनेत, महाराष्ट्राने उद्योग, कायदा–सुव्यवस्था आणि शिक्षणाच्या बाबतीत सातत्याने चांगली कामगिरी केली आहे.



**शफीक बागवान**
९८६०४००६८५
श्रीरामपूर

**प्रासंगिक**

आज बॉलिवूडमुळे महाराष्ट्र सांस्कृतिक जगतातही आघाडीवर आहे. मात्र काही क्षेत्रात विशेषतः शेतीत अजूनही शाश्वत उपायांची आवश्यकता आहे. इतर राज्यांप्रमाणे इथेही शेतकऱ्याचे प्रश्न आणि कामगारांचे हक्क पुन्हा केंद्रस्थानी आणावे लागतील. दरवर्षी आपण महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करतो. उत्सव साजरे करताना आपण आत्मपरीक्षण करणेदेखील अधिक महत्त्वाचे आहे. आपण राज्याच्या प्रत्येक घटकाचा सन्मान करतो का? शहर आणि गाव यामधील दरी कमी होते आहे का? श्रमिक, शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी यांचं स्थान या नव्या महाराष्ट्रात काय आहे, हे तपासायची ही वेळ आहे. यासाठी राज्य म्हणून आपल्याला पुढाकार घेऊन सर्वसमावेशक विकासात्मक धोरणाकडे वळावे लागेल. उद्योगधंदे, कृषी, शिक्षण आणि कायदा सुव्यवस्थेच्या क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक पारदर्शक आणि जनहितकारी उपाय योजना राबवणे आवश्यक आहे. तसेच कामगारांसाठी आधुनिक प्रशिक्षण, आरोग्य संरक्षण आणि सामाजिक सुरक्षेची व्यवस्था करणे हेही तितकेच गरजेचे आहे. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. या भाषेला टिकवण्याचे आव्हान आज उभे ठाकले आहे. महाराष्ट्रातील जमिनी परप्रांतीय गुंतवणुकीच्या नावाखाली घशात घालत आहेत. हे एक प्रकारचे सांस्कृतिक आक्रमणदेखील आहे. त्याविषयी धोरण आखण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन यांचा खरा अर्थ आहे. संघर्ष, श्रम आणि समृद्धी यांचा संगम. या दिवसाचे स्मरण केवळ इतिहासासाठी नाही, तर भविष्यासाठी प्रेरणादायी ठरावे, हीच अपेक्षा.



# पी.ए.इनामदार स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

**अहमदनगर । अबीद खान**

इकरा एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी संचालित पी.ए.इनामदार स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज गोविंदपुरा अहिल्यानगर येथे महाराष्ट्र दिना निमित्त सकाळी झेंडावदनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळेस शाळेचे प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य फिरोसअली यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देत आजच्या समाजात शिक्षणाच्या नवकल्पनां विषयी सखोल माहिती दिली. त्यांनी समाजासाठी उपयुक्त नवीन अभ्यासक्रम बाबत चर्चा केली, ज्यामध्ये वेगवेगळ्या शैक्षणिक विषयावर काम करण्यावर भर देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत यांनी झाली. यावेळी ध्वजारोहण करण्यात आले आणि उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला अभिवादन केले. उपप्राचार्या फरहाना शेख यांनी मुख्य पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# ...याविरुद्ध किसान सभा लढणारच; २० मे रोजी सत्याग्रहाची तयारी सुरू

**मुंबई । प्रतिनिधी**

अनेक विद्वान शेतकऱ्यांना कापुस लागवडीबाबत विद्वत्तापूर्ण सल्ले देत आहेत किंवा असतात. या सल्ल्यामध्ये बहुतेकदा अमुक कंपनीचे तमुक औषध बियाण्यानां लावा, कंपनीचेच खत द्या, तमुक कंपनीचेच बियाण्याचे वाण लावा. असे सल्ले असतात. मात्र कापुस भावाच्या हक्काचा लढा कसा द्यावा ? किमान आधारभुत किंमत योग्य प्रकारे ठरवण्याचे सुत्र काय असावे ? हे मात्र सांगण्याच्या भानगडीत ते पडत नाहीत. हे खरच तज्ञ आहेत की सेल्स एजंट, असा परखड सवाल अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी केला.



पुढे बोलताना क्षीरसागर म्हणाले, बोलगार्ड या कपाशीच्या बियाणाची गुलाबी बोंड–अळीबाबत प्रतीरोधक क्षमता २०१५ सालीच संपुष्टात आल्याचे अनेक शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. यामुळे गुलाबी बोंड–अळी प्रादुर्भावाने कपाशीचे उत्पन्न प्रचंड घटले आणि शेतकरी कंगाल झाला.

याबद्दलवरील प्रकारच्या विद्वानांनी कुठे भाष्य केल्याचे ऐकिवात नाही. कार्पोरेट कंपन्यांच्या भल्यासाठी एतद्देशीय मायबाप सरकारने सदर कालबाह्य बियाणाची ना मान्यता रद्द केली ना कंपनीला दंड ठोठावला.

शेतकऱ्यांच्या मरणयातना मात्र चालू आहेत.

धन्य त्या मढ्यावरच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या. धन्य एजंटगिरी करणारे सरकार. याविरुद्ध किसान सभा लढणारच. २० मे रोजी सत्याग्रहाची तयारी सुरू असल्याचे अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी ९८६०४८८८६० या क्रमांकावर शेतकऱ्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन केले.

# वन विभागाच्या तत्परतेमुळे ग्रे हेरॉन पक्ष्यास जीवदान

## पुरोहित निलेश जोशी यांचे प्रसंगावधान

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर घरभरणीच्या कार्यक्रमाचे पौरोहित्य करण्यासाठी पाथर्डी तालुक्यातील जांभळीला जात असताना निलेश जोशी यांना, एक घायाळ अवस्थेतील राखाडी बगळा आढळला. त्याच घरासमोर हा बगळा तडफडत पडल्याने हा अपशकून तर नाही ना, या विवंचनेत असलेल्या घरमालकाची त्यांनी समजूत काढून या पक्ष्याचे फोटो रयत समाचारचे विशेष प्रतिनिधी राजेंद्र देवढे यांना व्हाट्सअ‍ॅपवर पाठविले केले. निलेश जोशी यांनी सामायिक केलेले फोटो, देवढे यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे व वन परिमंडल अधिकारी बबनराव मंचरे यांना व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवून तातडीने दखल घेण्याचे आवाहन केले. त्यानंतर, क्षणभरही वेळ न दवडता बबनराव मंचरे यांनी वनरक्षक आप्पासाहेब घनवट यांना सोबत घेत जांभळीला जाऊन या पक्ष्याला ताब्यात घेतले. हा पक्षी बगळा कुळातील असला तरी राखाडी रंगाचा बगळा फार दुर्मिळ आहे. त्यामुळे, मंचरे यांनी त्याच्यावर तेथे प्रथमोपचार करत त्याला वनविभागाच्या कार्यालयात आणले. त्याला थोडी हुशारी वाटल्याचे जाणवल्यावर मंचरे व घनवट यांनी त्याला शिरसाठवाडी तलावात सोडून पाहिले. परंतु उष्माघाताने घायाळ झालेल्या या बगळ्याला सफाईदारपणे हालचाली करता येत नाहीत, हे लक्षात आल्यावर त्यांनी त्याला परत माघारी आणले. वनविभागाच्या कार्यालयात दोन दिवस ठेवल्यानंतर त्यांनी शुक्रवारी या बगळ्यास परत शिरसाठवाडी तलावावर नेऊन त्याचा अंदाज घेतला. यावेळी मात्र हा बगळा चांगलाच तंदुरुस्त झाला असल्यामुळे त्याने त्वरीत

**हा पक्षी गव्ही या मराठी व ग्रे हेरॉन या इंग्रजी नावाने ओळखला जातो. तो पानथळ जागा, तलाव, नद्या किंवा दलदलीत आढळतो. उंच शरीर, लांब चोच, राखट–पांढऱ्या रंगाची पिसं, लांब मान आणि पाय अशी त्याची शारीरिक ठेवण असते. मासे, बेडूक व अन्य जलचर कीटक पकडून तो उदरनिर्वाह करतो. आमच्या प्रयत्नांना यश आल्याचे पाहून समाधान झाले. तसेच एका मरणासन्न अवस्थेतील पक्ष्याला जीवदान मिळाल्याने कृतार्थ वाटले. निलेश जोशी यांनी सत्वर माहिती दिल्यामुळे त्यांचेही आभार व्यक्त करतो.**

**बबनराव मंचरे**
वन परिमंडल अधिकारी, वनविभाग पाथर्डी



शिरसाठवाडी जलाशयाला समांतर सूर मारत आकाशात झेप घेतली.



# कामगारांनी नवे कौशल्य आत्मसात करावे- विखे

## अतिक्रमणमुक्त एमआयडीसीसाठी कठोर कारवाई सुरु राहणार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

औद्योगिक क्षेत्राला सक्षम मनुष्यबळाची गरज असून, कामगारांनी वेगवेगळे कौशल्य आत्मसात करावे. काळानुरुप पारंपारिक काम कालबाह्य होत असताना वेगवेगळे कौशल्य आत्मसात करण्याची गरज निर्माण झाली आहे. हा बदल न स्विकारल्यास कामगारांना स्पर्धे तून बाजूला पडावे लागेल, यासाठी प्रवाहाबरोबर बदल स्वीकारण्याचे आवाहन पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. तर कामगार, उद्योजकांना सुरक्षा आणि दहशतमुक्तीसाठी एमआयडीसी अतिक्रमणमुक्त केली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र व कामगार दिनानिमित्त नगर जिल्हा मजदूर सेना व स्वराज्य कामगार संघटनेच्या वतीने आयोजित जिल्ह्यातील कामगारांच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील बोलत होते. सावेडी येथील माऊली संकुल सभागृहात झालेल्या या मेळाव्याप्रसंगी पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, अनिल शिंदे, स्वराज्य कामगार संघटनेचे अध्यक्ष दत्ता तापकिरे, आकाश कातोरे, सुनिल कदम, जिल्हा मजदूर सेनेचे सचिव वसंत सिंग, महेश लोंढे, मयुर गायकवाड, विशाल शितोळे, अमोल हुंबे, विनायक देशमुख आदींसह कामगार संघटनेचे पदाधिकारी व कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे विखे पाटील म्हणाले की, कामगार विश्वात अस्थिरता आहे. असंघटित कामगारांचे भविष्य अंधकारमय असून, उद्योग क्षेत्रात काही गडबड झाल्यास पहिला बळी असंघटित कामगारांचा जातो. असंघटित कामगारांसाठी या संघटना त्यांचे हित जोपासण्याचे काम करत असून, कंपनीच्या हिताला देखील बाधा आणली जात नाही, हे देखील महत्त्वाचे आहे. मुंबई मधील गिरणी कामगारांच्या संपात अनेक कामगार उध्वस्त झाले. मुंबईतील हे लोन नगर जिल्ह्यात आले, तेंव्हा येथील कामगार चळवळीतील नेत्यांनी ती विध्वंसक प्रवृत्ती चिरडून टाकली. एमआयडीसीमध्ये खंडणीखोरांच्या टोळ्यांच्या दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तर टपऱ्यांचे अतिक्रमण करुन गुंडांच्या टोळ्या पोसल्या जात आहे. या टपऱ्याचे अनाधिकृत अतिक्रमण तातडीने हटविण्याचे आदेश एमआयडीसीला दिलेले आहे. सुपा एमआयडीसी पूर्णतः साफ करण्यात आली असून, नगर एमआयडीसी देखील अतिक्रमण मुक्तीसाठी कारवाई सुरू करण्यात आलेली आहे. कामगार व उद्योजकांना सुरक्षा देण्यासाठी कठोरपणे हा निर्णय राबविला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. यावेळी शुभम पुंड, स्वप्नील खराडे, संतोष शेवाळे, अजिनाथ शिरसाट, प्रदिप दहातोंडे, दिपक परभणे, वसिम शेख, नामदेव झेंडे, शशीकांत संसारे, जितेंद्र तळेकर, सोमनाथ बारबोले आदी उपस्थित होते.

### आदर्श कामगारांचा सन्मान

**पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते आदर्श कामगार म्हणून प्रविण शिंदे, रामनाथ घुगे, प्रशांत भोग, सदाशिव रोहोकले, सोमनाथ पानमळकर, रामदास कोरडे, विजय गावडे, सुहास ब्रम्हे, संतोष ढवळे, कचेश्वर सुर्यवंशी, राहुल मेहरखांब, चंद्रकांत मोरे, संजय गायकवाड, रविंद्र डहाळे, कुंडलिक आमले, राहुल चितळकर, महेश काळे, विद्या पवार या कामगारांचा गौरव करण्यात आला.**

# बाजारपेठेत शोककळा; सर्व व्यवहार ठप्प

## आ. अरुण जगताप यांना श्रद्धांजली



**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अरुण जगताप यांच्या निधनानंतर कापड बाजार, मोची गल्ली मधील व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. शुक्रवारी ता. २ मे रोजी सकाळपासूनच बाजारपेठेत गहिवरलेले वातावरण होते.

दुकानदारांनी स्वयंस्फूर्तीने व्यवहार बंद ठेवत आपले दुःख व्यक्त केले. मोची गल्लीतील सर्व व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन आपला व्यवसाय बंद ठेवला होता. या बंदसाठी मोची गल्ली व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मन्सूरभाई शेख यांनी आवाहन केले होते, ज्याला संपूर्ण व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जगताप यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. दुकाने बंद असल्यामुळे कापड बाजार आणि मोची गल्लीत नेहमीचा गजबजाट दिसून आला नाही. बाजारपेठेत शुकशुकाट होता. जगताप यांचे बाजारपेठेतील प्रत्येक जाती-धर्माच्या व्यापारी आणि दुकानदारांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद व नगरकरांच्या मनाला चटका लावणारी आहे.

अहिल्यानगरच्या राजकारणात, समाजसेवेत त्यांचे अमूल्य असे योगदान राहिले. त्यांच्या निधनाने शहराचे मोठे नुकसान झाले असून, दूरदृष्टीचा नेता गमावला असल्याची भावना मन्सूर शेख यांनी व्यक्त केली.

# अमेझिंग अबॅकसच्या १०३ विद्यार्थ्यांचे यश

## खा. लंके यांच्या हस्ते पारितोषिक वितरण



**अहमदनगर । प्रतिनिधी**

अमेझिंग अबॅकसने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये तब्बल १०३ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. मार्च महिन्यात झालेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरण नुकतेच हॉटेल यश ग्रँड येथे खा. निलेश लंके यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माजी नगरसेवक योगिराज गाडे उपस्थित होते. या स्पर्धेत अहिल्यानगर, संभाजीनगर, सिल्लोड, नागपूर, मुंबई, तसेच परदेशातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. अबॅकसच्या या स्पर्धेमध्ये एकूण १०३ विद्यार्थ्यांना घवघवीत यश मिळाले. सार्थक गाली, अनुश्री भापकर, विनीत महादेव, नुपूर भामरे, ओम झोडगेकर, आरव माकीजा, ओवी दंडाळे, गायत्री अहिरे, शुभ्रा तरोडे, हर्ष उखाणे, अर्जुन पाटील या विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. अबॅकस ही गणिताची जुनी व अत्यंत प्रभावी तंत्रशुद्ध पद्धत असून त्यामुळे कमी वेळेत गणित सोडविण्याची कला अवगत होते. त्यामुळे अबॅकसचे महत्त्व वाढत आहे. या स्पर्धेमध्ये अहिल्यानगर, छत्रपती संभाजी नगर, सिल्लोड, नागपूर, मुंबई व देशा-विदेशातील विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या थाटात पार पडला. या वेळी विद्यार्थ्यांनी अबॅकसची प्रात्यक्षिके करून दाखवली. अवघड गणितांची उत्तरे अवघ्या काही सेकंदांत सोडवून उपस्थित खा. लंके यांच्यासह सर्वांनाच आचंबित केले. खा. लंके यांनी अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ व अश्विनी बल्लाळ यांच्यासह विद्यार्थ्यांचे कौतूक केले. डिस्ट्रिक्ट लेव्हल कॉम्पिटिशन ऑफ अमेझिंग अबॅकसच्या स्पर्धेत विद्यार्थ्यांसोबत पालकांनी सुद्धा दहा मिनिटांचा पेपर सोडवून सहभाग नोंदवला. यावेळी योगिराज गाडे यांनी सामान्य ज्ञानावर आधारित खेळही घेतले. यशस्वी विद्यार्थ्यांना अमेझिंग अबॅकसचे संचालक किरण बल्लाळ व अश्विनी बल्लाळ, तसेच सहशिक्षक पोटे, प्रतीक्षा भवर, कांबळी जयश्री, प्रज्ञा विभूती, डिंपल शर्मा, मीनल बल्लाळ, कांचन दंडाळे, रेवती बल्लाळ, श्रद्धा देशमुख, शिल्पा गतफने, आशा पवार, ऐश्वर्या तोरडमल, धनश्री तोरडमल यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी सोहम गाली, दुर्वांक जाधव व ईशान बल्लाळ यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रतीक्षा भवर यांनी केले. किरण बल्लाळ यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांच्या यशातच शिक्षकांचे समाधान असते- रामकिसन देशमुख

**अहमदनगर । विजय मते**

श्रांती निषिद्ध आहे, असे महात्मा गांधींनी सांगितले. त्याप्रमाणे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे आमचे सर्वांचे प्रेरणास्थान असणारे स्व. डॉ. नाथ पाऊलबुद्धे यांनी शिक्षणाच्या प्रचारासाठी अविश्रांतपणे काम केले. त्यांची प्रेरणा घेऊन या संस्थेचे संचालक, शाळेतील सर्व शिक्षक स्वतः ला झोकून देत काम करतात त्यामुळेच ही संस्था नावारूपाला आली. शिक्षकांच्या अथक परिश्रमामुळे या विद्यालयातील असंख्य विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत झाले. त्यांनी स्वतः चे नाव उंचावुन शाळेचे देखील नावलौकिक वाढविले. शिक्षकांचे खरे समाधान हे विद्यार्थ्यांच्या यशात असते, असे प्रतिपादन संस्थेचे सह सचिव रामकिसन देशमुख यांनी केले. अहिल्यानगर येथील डॉ. ना.ज. पाऊलबुद्धे माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयाचे प्राचार्य भरत बिडवे यांचा सेवापूर्ती निमित्त संस्था व शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सेवा शिक्षक प्रसारक मंडळाचे सह सचिव रामकिसन देशमुख, खजिनदार प्रा. दादासाहेब भोईटे, बाळकृष्ण सिद्दम, रघुनाथ कारमपुरी, शैक्षणिक संकुल प्रमुख डॉ. रेखाराणी खुराणा तसेच सर्व युनिटचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद उपस्थित होते. देशमुख म्हणाले संस्था उभारणीपासून भरत बिडवे हे स्व.डॉ.नाथ पाऊलबुद्धे यांच्याबरोबर काम करीत होते. त्यांच्या कामाची पद्धत, घेतलेल्या अनुभवामुळे बिडवे सरांनी देखील आपली शाळा म्हणून काम करताना थोडा देखील अभिमान बाळगला नाही. मुख्यध्यापक असताना ज्यावेळी शाळेचे बांधकाम सुरू होते त्यावेळी बांधकामावर पाणी मारायला ते स्वतःहून पुढे येत. खेळाचे मैदानाची सुद्धा साफसफाई करताना ते मागेपुढे पाहत नव्हते. अण्णांच्या कार्याचा वसा ते जोपासत, आज जरी ते सेवानिवृत्त झाले तरीही संस्थेकरीता त्यांचे काम सुरू राहणार, असे मला वाटते. संस्थेचे खजिनदार दादा भोईटे, डॉ, रेखाराणी खुराणा, प्रा.आशा गावडे आदिंसह अनेकांनी आपल्या मनोगता मधून सरांबरोबर काम करताना आलेल्या गोड आठवणींना उजाळा दिला. सत्काराला उत्तर देताना भरत बिडवे म्हणाले की, मी शासकीय कागदोपत्री शाळेतून सेवानिवृत्त झालो, आपला सहवास नसणार, पण तुमच्या सोबत मी असणार, तुम्ही फक्त सेवेतुन मला निरोप दिला.





# डॉ. पाउलबुधे शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र दिन साजरा


**अहमदनगर । विजय मते**

अहिल्यानगर येथील वसंत टेकडी जवळील डॉ. ना.ज. पाऊलबुधे शैक्षणिक संकुलात १ मे रोजी महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी प्राचार्य भरत बिडवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले प्रमुख अतिथी डॉ.अमित गागरे तसेच शैक्षणिक संकुल प्रमुख डॉ. रेखाराणी खुराणा, प्राचार्य डॉ.श्याम पांगा,संदीप कांबळे, प्राचार्या अनुराधा चव्हाण,सविता सानप, डॉ.सुचित्रा डावरे आदी उपस्थित होते. यावेळी बोलतांना बिडवे यांनी सांगितले की गेली ३३ वर्षे काम करताना राष्ट्रीय उत्सव साजरा करताना मी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करीत होतो आज सेवानिवृत्त होत असताना मला झेंडा फडकविण्याचा मान देऊन जो सन्मान दिला तो कधीच विसरू शकणार नाही. सर्वांचे आभार त्यांनी मानले उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व आपल्या भाषणातून सांगितले.

# भगवान महावीर चषक बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात

## युवकांचा उत्स्फूर्त सहभाग; नव्या उपक्रमांना उत्तम प्रतिसाद



**अहमदनगर । प्रतिनिधी**

वाडिया पार्क मैदानावर भगवान महावीर चषक क्रीडा महोत्सव अंतर्गत आयोजित करण्यात आलेली बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात पार पडली. असून गेल्या १६ वर्षांपासून फ्लड लाईट टेनिस बॉल क्रिकेट महोत्सवाने यंदा नव्याने रस्सीखेच, धावणे आणि बॅडमिंटनसारख्या विविध स्पर्धांचा समावेश करून युवकांना त्यांच्या आवडत्या खेळात सहभागी होण्याची संधी दिली आहे. वाडिया पार्क येथील बॅडमिंटन हॉलमध्ये ही स्पर्धा मोठ्या जल्लोषात पार पडली. विविध वयोगटांतील युवक मोठ्या संख्येने सहभाग घेत, आपल्या खेळगुणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. खेळाडूंच्या खेळातील चपळता, नेटकेपणा आणि जिद्द पाहून उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना प्रोत्साहन दिले.

यावेळी बोलताना भगवान महावीर चषक परिवाराचे राजेंद्र गांधी हे म्हणाले की, हे केवळ खेळ नसून सामाजिक सलोखा, एकत्रितपणा आणि युवा शक्तीला दिशा देण्याचा एक सुंदर उपक्रम आहे. वर्षानुवर्षे युवकांना व्यासपीठ मिळावे, त्यांच्या कौशल्यांना चालना मिळावी यासाठी आम्ही ही स्पर्धा आयोजित करतो आहोत.

यंदा बॅडमिंटनसारख्या खेळांचा समावेश केल्यामुळे युवकांमध्ये उत्साह ओसंडून वाहतो आहे. स्पर्धेच्या आयोजनात स्वयंसेवक, प्रशिक्षक वर्गानेही मोलाचे योगदान दिले. विजय प्राप्त केलेल्या खेळाडूंना पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे वाडिया पार्क परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांनी देखील या क्रीडा महोत्सवाचे कौतुक केले आहे.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# ॲड. सयाराम बानकर यांना उल्लेखनीय सेवा पुरस्कार

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते सन्मान

**नेवासा । विजय खंडागळे**

श्री क्षेत्र शनी शिंगणापूर येथील पोलीस पाटील ॲड. सयाराम बानकर यांना महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने राज्यपालांच्या वतीने दिला जाणारा उल्लेखनीय सेवा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. अहमदनगर येथील पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणात पार पडलेल्या कार्यक्रमात जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते ॲड. बानकर यांना प्रशस्तीपत्र, स्मृतीचिन्ह व २५ हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर आदी मान्यवर उपस्थित होते. ॲड. सयाराम बानकर यांनी शनी शिंगणापूर परिसरात शांतता, सामाजिक सलोखा, तसेच न्यायदान प्रक्रियेत उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या सेवेची दखल घेऊन शासनाच्या वतीने हा राज्यातील पोलीस पाटलांना दिला जाणारा सर्वोच्च सन्मान देण्यात आला आहे.पुरस्काराबाबत प्रतिक्रिया



देताना ॲड. बानकर म्हणाले, शनी देवाचा आशीर्वाद व स्व. बानकर भाऊंची पुण्याई हीच माझ्यासाठी शनीप्रसादासारखी आहे. हा सन्मान माझ्यासाठी आनंददायी आणि अविस्मरणीय आहे. या कार्यक्रमास गणेशवाडीचे सरपंच कैलास दरंदले, पोलीस पाटील संघटनेचे नेवासा तालुका अध्यक्ष रमेश डोळे, संजय दहिफळे, आसाराम कोरळडे, प्रसाद दहिफळे, सुरेश बानकर, भाऊसाहेब बानकर, कचरू जंगले, बाळासाहेब बानकर, रामभाऊ जगताप, बापूसाहेब निबे आदी मान्यवर उपस्थित होते. ॲड. सयाराम बानकर यांच्या या सन्मानाबद्दल परिसरातून विविध स्तरांवरून त्यांचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे.



# भाजपा तालुकाध्यक्षपदी गोर्डे, कदम तर शहराध्यक्षपदी आढाव

**कोपरगाव । किसन पवार**

तालुका भारतीय जनता पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी विशाल गोर्डे (पुर्व भाग), सुनिल कदम (पश्चिम भाग) तर शहराध्यक्षपदी वैभव आढाव यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडी होण्यासाठी भाजपाचे जिल्हा निवडणुक प्रमुख राजेंद्र गोंदकर हे अध्यक्षस्थानी होते. कोपरगाव भाजपा कार्यालयात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी सत्कार केला.तसेच मावळते अध्यक्ष कैलास राहणे, शहराध्यक्ष दत्तात्रय काले यांचा देखील सत्कार केला. प्रारंभी पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली वाहण्यांत आली.

बिपीन कोल्हे याप्रसंगी बोलतांना म्हणाले की, भारतीय जनता पक्ष देशात सर्वात मोठा पक्ष असुन कोपरगाव शहरासह तालुक्यात या पक्षाची ध्येय धोरणे तळागाळात पोहोचविण्यांसाठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी जोमाने काम करावे, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ पासुन भारतीय जनता पक्षाला संघटनशक्तीच्या जोरावर सर्वोच्चस्थानी नेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष व मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे हात बळकट करून शासकीय योजनांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी सर्व प्राथमिक सदस्य, बुथप्रमुखासह सर्वच भाजप घटकांनी काम करावे. माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांनी या मतदार संघात कार्यकत्यांचे जाळे घट्ट विणलेले आहे. माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनीही भारतीय जनता पक्षाच्या माध्यमांतुन महिलाशक्तीसह तालुक्यातील विविध घटकांना एकत्रीत करून त्यांच्या विकासात योगदान दिलेले आहे. नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष विशाल गोर्डे व सुनिल कदम सत्कारास उत्तर देतांना म्हणाले की, युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली कोपरगाव तालुका भारतीय जनता पार्टीचा अध्यक्ष म्हणून सदस्यांची वीण अधिक मजबुत करून येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत पक्षाची ध्येयधोरणे पोहोचवुन विजयश्री खेचुन आणू.

शहराध्यक्ष वैभव आढाव म्हणाले की, येणारा पुढचा काळ संघर्षांचा आहे. भारतीय जनता पक्ष या ताकदीच्या बळावर बिपीन कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे जेथे जेथे सहकार्य लागेल ते घेवुन काम करू. प्रारंभी विक्रम पाचोरे यांनी प्रास्तविक केले. सुत्रसंचलन दिपक चौधरी यांनी केले तर बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम यांनी आभार मानले. याप्रसंगी राजेंद्र सोनवणे, बाळासाहेब नरोडे, विजय आढाव, प्रदिप नवले, नारायण अग्रवाल, दादासाहेब नाईकवाडे, सिध्दार्थ साठे, रविंद्र लचुरे, खालील कुरेशी, सतिष रानोडे, यांच्यासह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते, भाजपा सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देवगड विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल कामगिरी



शिवन्या योगेश पावसे (गुण -२३६) | ऋतुराज संतोष पावसे (गुण -२०६) | वैष्णवी भगवान शिर्के (गुण -१८६) | जय विजय पावसे (गुण - १८४)

आर्या लहानु भालेराव (गुण -१७४) | प्रगती संदीप पावसे (गुण - १७२) | रणदीप संतोष शिरसाठ (गुण - १६६) | मोहम्मद उमर मन्सुर इनामदार (गुण - १४०)

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथील देवगड विद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतविद्यालयातील आठ विद्यार्थ्यांनी पात्रता मिळवून शाळेचे व गावाचे नाव उज्वल केले आहे. विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

त्याप्रसंगी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा उगले यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले,आमच्या विद्यार्थ्यांनी जिद्द,चिकाटी आणि सातत्याने मेहनत करत हे यश संपादन केले आहे.शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन व पालकांचा सातत्यपूर्ण पाठिंबा देखील या यशामागील महत्त्वाचा भाग आहे.भविष्यात आमचे विद्यार्थी राज्यस्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करतील,असा आम्हाला विश्वास आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिवन्या योगेश पावसे,ऋतुराज संतोष पावसे,वैष्णवी भगवान शिर्के,जय विजय पावसे,आर्या लहानु भालेराव,प्रगती संदीप पावसे,रणदीप संतोष शिरसाठ आणि मोहम्मद उमर मन्सूर इनामदार या विद्यार्थ्यांनी शाळेतील नियमित सराव परीक्षा,कठोर अभ्यास व शिक्षकांचे तंत्रशुद्ध मार्गदर्शन यांच्या आधारावर हे यश संपादन केले आहे. शाळेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या विशेष उपक्रमांचा आणि अतिरिक्त सराव सत्रांचा यामध्ये मोठा वाटा आहे.शिक्षक माने मदन यांनी विद्यार्थ्यांना मराठी,थोरात दिनेश यांनी गणित व बुद्धिमत्ता, वर्पे सविता यांनी इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन केले.देवगड विद्यालयाने या आधीही विविध शैक्षणिक व स्पर्धा परीक्षांमध्ये सातत्याने यश मिळवले आहे. यंदाचे यश हे विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीचे व विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे फलित आहे,असे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुनंदा उगले यांनी सांगितले. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी तसेच सरपंच सुभाष गडाख,उपसरपंच सुजाता दवंगे,देवगड देवस्थानाचे अध्यक्ष गणपत पावसे,सेवानिवृत्त मुख्याध्यापक रमेश पावसे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.विद्यार्थ्यांनी परीक्षेत दाखवलेली गुणवत्ता व मेहनत कौतुकास्पद आहे.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका,शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी,संस्थेचे पदाधिकारी या सर्वांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. भविष्यात अशाच प्रकारे उज्ज्वल यश संपादन करून विद्यालयाचे आणि पालकांचे नाव मोठे करावे अशा शुभेच्छा हिवरगाव पावसा ग्रामस्थ व पंचक्रोशीतून देत अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेला अखेर यश- फटांगडे

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

राज्याच्या कृषी मंत्र्यांनी विधानसभेत शेतकऱ्यांच्या पीक विम्याचे पैसे तातडीने एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच देण्याचे जाहीर केले होते या प्रश्नासंदर्भात विधान सभेतील सर्वच विरोधी पक्ष सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याचबरोबर आमदार सुरेश धस यांनी बीडसह महाराष्ट्र मध्ये मोठ्या प्रमाणात पिक विमा घोटाळा कसा झाला याबाबत प्रश्न उपस्थित केल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सखोल चौकशी करून खऱ्या लाभार्थींना कसा न्याय मिळेल यावर एक समिती नेमली व आज शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विमा जमा होण्यास सुरुवात झाली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे व स्वाभिमानी शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या पिक विम्याच्या संदर्भात अत्यंत ज्वलंत असलेल्या प्रश्नाबाबत पुण्यनगरीने यश आले. मागील आठवड्यात दैनिक पुण्यनगरीच्या अहिल्यानगर/नाशिक या आवृत्तीने शेतकऱ्यांच्या ज्वलंत असलेल्या पिक विमा बाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रश्नाला प्रसिद्धी दिल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे पीक विम्याचे पैसे येण्यास सुरुवात झाली आहे. थोडे उशिराना का होईना परंतु शेतकऱ्यांच्या बँक खात्यात येण्यास सुरुवात झाली असल्यामुळे काही शेतकऱ्यांच्या मात्र अजून बऱ्याच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही. यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे परंतु स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सर्वच



तालुका पदाधिकारीशेतकऱ्यांना सर्व पीक विम्याचे पैसे झाल्याशिवाय स्वस्त बसणार नसल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे यांनी शेतकऱ्यांना आधार दिला. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात पिक विमा घोटाळा पूर्वीच्या सरकारच्या काळात व आताच्या सरकारच्या काळात घडल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकऱ्यांनी व महाराष्ट्रातील विरोधी पक्ष नेत्यांनी या गोष्टीचा सरकारला वारंवार जाब विचारल्यामुळे सरकारला व कंपन्याला अखेर शेतकऱ्यांपुढे झुकावा लागले. हा शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने विजय असल्याचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच यापुढे शासनाने पिक विमा बाबत शेतकऱ्यांनी घोटाळ्या न करता यामध्ये कंपनी आणि सरकारचेच काही मंत्रींनी घोटाळा केल्यामुळे ही पिक विमा मोठ्या बदनामीला सामोरे जावे लागले आहे. असे असताना शेतकऱ्यांना बदनाम करू नका असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने उपमुख्यमंत्री अजितदादा यांना सुनावले आहे. मात्र याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पिक विमा आमच्या हक्काचा नाही कोणाच्या बापाचा या म्हणीप्रमाणे हा खेळ शेतकऱ्यांना न्याय दिल्याची भूमिका शेतकऱ्यांनी व्यक्त केली. तसेच शेवगाव तालुका पिक विमा प्रतिनिधी नरहरी शहाणे यांचे ही शेतकरी संघटनेने आभार व्यक्त केले व वेळोवेळी शेतकरी यांना मार्गदर्शन केल्यामुळे शेतकऱ्यांना आधार मिळाला.





# लक्षवेधकडून चैतन्य आगळे याचा सन्मान

**शेवगाव । नरहरी शहाणे**

शासनमान्य लक्ष्यवेध फाउंडेशन संचलित घेण्यात आलेल्या लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच काही दिवसांपूर्वी जाहीर झाला. त्यानंतर राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी ही जाहीर करण्यात आली. यामध्ये शेवगाव तालुक्यातील काळेगाव जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी चैतन्य शहाराम आगळे याने १५० पैकी १४२ गुण मिळवून राज्यात पाचवा क्रमांक पटकावला. तर शाळेतील मयुरी कडूस, दिव्या लोखंडे,साई पिंगळे, त्रिवेणी लोखंडे, वेदांती शेकडे, शुभ्रा लांडे या विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत आपले नाव कोरले. संपूर्ण राज्यामध्ये एकाच वेळत घेण्यात आलेल्या या स्पर्धेस राज्यभरातून विद्यार्थी पालक व शिक्षक वर्गातूनही प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.या स्पर्धेत राज्य पातळीवर पाचवा क्रमांक मिळवलेल्या चैतन्य आगळे याचा शिक्षण सहसंचालक रमाकांत काटमोरे साहेब यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी विचार मंचावर दिनकर टेमकर साहेब, मा.शिक्षणाधिकारी रामदास हराळ, सहाय्यक आयुक्त अनिल काळे,विशाल शितोळे, रमेश कासार, ओंकार खुंटाळे, राहुल जगदाळे, प्रसिद्ध कवी डॉ.कैलास दौंड, तुकाराम धांडे, दादासाहेब कोते, कबड्डी कर्णधार शिवछत्रपती पुरस्कार विजेता शंकर गदाई यांच्यासह आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. त्याच्या या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक संदीप आहेर उपमुख्याध्यापक लक्ष्मण पिंगळे यांचे मार्गदर्शन लाभले.


# कला या फक्त मनोरंजनासाठी नसून त्या परिवर्तनाची शस्त्रे आहेत- प्रा.पाटील

## सांगली येथे अंनिसच्या विवेक रेषा व्यंगचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन

**सांगली । प्रतिनिधी**

दैववाद, अंधश्रद्धा आणि अज्ञान यांच्या गुंगीमध्ये असणाऱ्या जनतेला स्वप्रयत्नांची जाणीव करून देण्यासाठी व्यंगचित्र हे प्रभावी माध्यम आहे, असा विचार करून १९२० सालामध्ये किर्लोस्कर खबर या मासिकांमध्ये मराठीतील पहिली व्यंगचित्रे प्रसिद्ध करणारे आद्य व्यंगचित्रकार शंकरराव किर्लोस्कर यांच्या सांगली जिल्ह्यामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन या विषयाला वाहिलेले व्यंगचित्र प्रदर्शन भरले आहे, ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन व्यंगचित्रकार प्राचार्य बाळासाहेब पाटील यांनी केले.

ते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आयोजित विवेक रेषा या व्यंगचित्र प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी सांगली येथे बोलत होते. या व्यंगचित्र प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य पाटील यांच्या हस्ते



व्यंगचित्र काढून अभिनव पद्धतीने करण्यात आले. व्यंगचित्रकार प्राचार्य पाटील पुढे म्हणाले, सर्व कला या फक्त मनोरंजनासाठी नसून ती परिवर्तनाची शस्त्रे आहेत. व्यंगचित्र हे सामाजिक आणि राजकीय विसंगतीवर भाष्य करते. त्याला व्यंगाची झाक असते, म्हणून व्यंगचित्र हे लोकांना लवकरच समजते. म्हणून याचा वापर आपण समाज प्रबोधनासाठी मोठ्या प्रमाणात केला पाहिजे. प्राचार्य पाटील पुढे म्हणाले, उद्योजक आणि चित्रकार शंकरराव किर्लोस्कर यांनी किर्लोस्करवाडी येथे १९२० साली सुरू केलेल्या किर्लोस्कर खबर या मासिकात त्यांनी व्यंगचित्र हा कलाप्रकार प्रबोधनासाठी वापरला. तेव्हा शंकरराव किर्लोस्कर यांनी हाताळलेले अंधश्रद्धा, दैववाद या विषयावर आज ही आपल्याला काम करावे लागते.

अंनिसचे सांगली जिल्हाध्यक्ष व्ही.वाय. आबा पाटील म्हणाले, दहा भाषणापेक्षा एक व्यंगचित्र सारे काही सांगून जाते. एकादी गोष्ट ऐकण्यापेक्षा प्रयत्न बघितलेले चित्र जास्त लक्षात राहते. परिवर्तनवादी चळवळींनी या व्यंगचित्र कलेचा वापर आपल्या प्रबोधनाच्या कार्यात केला पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष कामगार नेते ॲड. अजितराव सूर्यवंशी म्हणाले, सध्या समाजामध्ये वाढत असलेल्या विकृतीवर व्यंगचित्राच्या माध्यमातून बोट ठेवले जाते, त्यामुळे व्यंगचित्र हे समाजाला आत्मपरीक्षण करायला शिकवते. अंनिसचे हे व्यंगचित्र प्रदर्शन गावोगावी घेऊन जाण्यासाठी आम्ही नक्की प्रयत्न करू. फारुख गवंडी यांनी सूत्रसंचालन तर प्रास्ताविक राहुल थोरात यांनी केले.

डॉ. संजय निटवे यांनी स्वागत केले. तर त्रिशला शहा आभार यांनी मांडले. कार्यक्रमास सुनील भिंगे, आशा धनाले, जगदीश काबरे, ज्योती आदाटे, गणेश कांबळे, रमेश सहस्त्रबुद्धे, सुभाष कुलकर्णी उपस्थित होते. प्रदर्शनाचे संयोजन सुहास पवार, सुहास यरोडकर, संजय गलगले यांनी केले.


### आज व्यंगचित्र प्रशिक्षण कार्यशाळा

**हे व्यंगचित्र प्रदर्शन रविवारपर्यंत कामगार भवन, महात्मा गांधी रोड, सांगली येथे सुरू असणार आहे. त्यानिमित्त आज शनिवारी ता. ३ मे रोजी सकाळी ११ ते ४ पर्यंत व्यंगचित्र आणि ॲनिमेशन कार्यशाळा संपन्न होणार आहे. यामध्ये साप्ताहिक मार्मिकचे व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव, रोहित कबाडे आणि मुंबई येथील अनिमेटर जयेश दळवी यांचे व्यंगचित्र प्रात्यक्षिक होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.**

# असा पाहिजे महाराष्ट्र

**मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा...**

राकट देशा, कणखर देशा, दगडांचा देशा.... असे ज्या महाराष्ट्राचे वर्णन केले जाते त्या महाराष्ट्रात माझा जन्म झाला, त्या महाराष्ट्रात मी लहानाचा मोठा झालो, वाढलो याचा मला सार्थ अभिमान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाने आणि साधू संतांच्या वाणीने पावन झालेली ही पवित्र महाराष्ट्र भूमी. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, संत गाडगेबाबा यासारखे महापुरुषही मराठी मातीनेच भारताला दिले. सात बेटांचे शहर म्हणून ओळखली जाणारी व देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई ही याच महाराष्ट्राची राजधानी आहे. देशाला सर्वात जास्त महसूल हा मुंबईतूनच मिळतो, पण याच मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याचा डाव दिल्लीश्वरांनी घातला, तेंव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती करण्यासाठी १०६ हुतात्म्यांना बलिदान द्यावे लागले. याच १०६ हुतात्म्यांमुळे संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली. महाराष्ट्राची निर्मिती होऊन आज ६५ वर्ष पूर्ण झाली आहेत. या ६५ वर्षात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण, आरोग्य, शेती, जलसिंचन, विज्ञान, तंत्रदान, उद्योग, व्यापार अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने नेत्रदीपक प्रगती केली आहे. आज महाराष्ट्र देशातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.



जगाला हेवा वाटावा असा निसर्ग महाराष्ट्राला लाभला आहे. एककिडे उंचच सह्याद्रीच्या रांगा तर दुसरीकडे ७२० किलोमीटरचा निसर्गरम्य समुद्रकिनारा. महाराष्ट्राला निसर्गाने भरभरून दान दिले आहे. असे असले तरी आजही महाराष्ट्रात अनेक समस्या आणि आव्हाने आहेत. महाराष्ट्रातच आज मराठी भाषेची गळचेपी होऊ लागली आहे. परप्रांतीयांच्या लोंढ्यामुळे मुंबई सारख्या शहरातून मराठी माणूस हद्दपार होतो की काय, अशी शंका येऊ लागली आहे. अमृतातही पैज जिंकणारी असे जीचे वर्णन केले जाते, त्या मराठी भाषेची महाराष्ट्रातच उपेक्षा होऊ लागली आहे. मराठी भाषा बोलायला तरुणांना लाज वाटते. आज मराठी तरुण मराठी भाषा बोलण्याऐवजी हिंदी व इंग्रजी बोलण्याला प्राधान्य देत आहे. हिंदी व इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा महाराष्ट्रातच मागे पडू लागली आहे. पालकही आपल्या पाल्यांना मराठी ऐवजी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत दाखल करू लागले आहेत. विद्यार्थ्यांअभावी मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू लागल्या आहेत. अभिजात भाषेचे सर्व निकष पूर्ण करूनही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला जात नाही. सर्वसामान्य नागरिकांपासून, साहित्यिक तसेच राज्यातील अनेक नेत्यांनी ही मागणी करूनही शासन दरबारी त्याला वाटण्याच्या अक्षता लावल्या जात आहेत.

आज राज्यातील ४० टक्के जनता ही तरुण आहे. पण, या तरुणांच्या हाती रोजगार नाही. राज्यात बेरोजगारीने कळस गाठला आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही हाती काम नसल्याने तरुणांना नैराश्य आले आहे. जर या तरुणांना नैराश्यातून बाहेर काढायचे असेल तर सरकारने रोजगार वाढीसंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. महाराष्ट्रातील तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. जर या तरुणांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतला तर महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातील तरुण सुशिक्षित असेल पण बेरोजगार नसेल. तरुणांप्रमाणेच शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे अनेक प्रश्न आहेत. तरुणांप्रमाणे शेतकरी, कष्टकरी व वंचित वर्गाचे प्रश्न सुटले तर महाराष्ट्रात पुन्हा एकदा शेतकरी, कष्टकरी वर्गाचे राज्य येईल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्र उद्योग व्यवसायात अग्रेसर असेल. शेतीसहित अनेक लहान मोठ्या उद्योगांचा विकास झालेला असेल तो ही पर्यावरणाचा ऱ्हास न होता. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात पी जी ते के जी शिक्षण मोफत असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात सर्वांना परवडेल अशा दरात आरोग्यसेवा उपलब्ध असेल. पैसे नाहीत म्हणून कुणाचाही जीव जाणार नाही. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात भ्रष्टाचाराला थारा नसेल. शिवशाहित ज्याप्रमाणे माताभगिनी सुरक्षित होत्या, तशाच माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रातही माताभगिनी सुरक्षित असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्रात जात-पात, धर्म -वंश याला थारा नसेल. भय, भूक आणि भ्रष्टाचार मुक्त असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल. माझ्या स्वप्नातील महाराष्ट्राची कीर्ती केवळ भारतातच नाही तर जगात पसरेल. संपूर्ण जगाला हेवा वाटेल असा माझा स्वप्नातील महाराष्ट्र असेल.





# गुणवंत क्रीडा मार्गदर्शक डेव्हिड मकासरे यांच्यासह गुणवंत खेळाडू श्रीनिवास कराळे, कोमल वाकळे यांचा गौरव

## जिल्हा क्रिडा पुरस्काराचे १ मे महाराष्ट्र दिनी वितरण

**अहमदनगर । प्रतिनिधी**

डॉ. राधाकृष्ण विखे पाटील मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अहिल्यानगर यांच्या हस्ते सन २०१९-२० ते २०२३-२४ या पाच वर्षातील जिल्हा क्रीडा पुरस्काराचे वितरण करण्यात आले. जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने क्रीडा क्षेत्रामध्ये जिल्ह्याचे नाव उज्वल करणाऱ्या खेळाडू, मार्गदर्शक, कार्यकर्ता- संघटक यांना दिले जाणारे पुरस्कार ता.१ मे रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पोलीस मुख्यालयावरील मैदानावर प्रदान करण्यात आले. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम रुपये दहा हजार प्रत्येक पुरस्कारार्थी यांना देऊन गौरविण्यात आले. या पुरस्कार वितरण प्रसंगी जिल्हाधिकारी माननीय डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, पोलीस अधीक्षक राकेश ओला, मनपा प्रशासक यशवंत डांगे, जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडाधिकारी भाऊराव वीर, राज्य क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, विशाल गर्जे, प्रवीण कोंढावळे, क्रीडाधिकारी प्रियांका खिंडरे, वरिष्ठ लिपिक रमेश जगताप, मानद कर्मचारी मीना जगताप, साक्षी दळवी, सागर पवार यांच्याबरोबर जिल्हा ऑलम्पिक संघटनेचे पदाधिकारी शैलेश गवळी, प्रा.संजय साठे, विजय मिस्किन, अविनाश काळे, मनीष राठोड व क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार डेविड सुरेश मकासरे. गुणवंत खेळाडू पुरुष पुरस्कार सोमनाथ सपकाळ. गुणवंत खेळाडू महिला पुरस्कार अपूर्वा गोरे. गुणवंत खेळाडू पुरस्कार दिव्यांग सुहास मोरे. गुणवंत खेळाडू थेट पुरस्कार फिजा सय्यद. सन २०२०-२१ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कार विजय म्हस्के. गुणवंत खेळाडू पुरुष किरण गहाणडुले. गुणवंत खेळाडू महिला वैष्णवी गोडळकर. सन २०२१-२२ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक विजय देशमुख. गुणवंत खेळाडू पुरुष श्रीनिवास कराळे. गुणवंत खेळाडू महिला विश्वेशा मिस्कीन. २०२२-२३ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक श्रीराम सेतू आवारी. गुणवंत खेळाडू पुरुष ओम करांडे. गुणवंत खेळाडू महिला कोमल वाकळे. सन २०२३-२४ गुणवंत क्रीडा मार्गदर्शक लक्ष्मण उदमले. गुणवंत खेळाडू पुरुष ओंकार सुरत.गुणवंत खेळाडू महिला योगिता खेडकर व गुणवंत खेळाडू पुरुष विशेष पुरस्कार शंकर गदाई यांना प्रदान करण्यात आला. सन २०१९-२० गुणवंत क्रीडा कार्यकर्ता संघटक पुरस्कार दिनेश लक्ष्मण भालेराव यांचा गौरव करण्यात आला.

# संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या सात अभियंत्यांना नोकरी

## टी अँड पी विभाग आघाडीची कामगिरी



**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नाने टीसीएस, आरस्केअरसॉफ्ट टेक्नॉलॉजिज व एसिअन हर्ट या कंपन्यांचा कॅम्पस मुलाखती आयोजीत केल्या होत्या. यात या तीन कंपन्यांनी कॉलेजच्या अंतिम वर्षातील सात नवोदित अभियंत्यांची चांगल्या वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली आहे. टी अँड पी विभागाने एका पाठोपाठ एक अशा अनेक कंपन्यांमध्ये आपल्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवुन देण्यात आघाडी घेतली आहे, अशी माहिती महाविद्यालयाने दिली आहे. या मुलाखतीत टीसीएस कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋतिका रामचंद्र घावटे व अच्युत अजय सारंगधर यांची निवड केली आहे. आरस्केअरसॉफ्ट टेक्नॉलॉजिज कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या रोहित प्रकाश चव्हाण व इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या जालिंदरनाथ सुभाष कांगणे आणि तुषार सुधाकर पेटकर यांची निवड केली आहे.एसिअन हर्ट कंपनीने इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या सिध्दी सतीश आमले व अथर्व सचिन जोशी यांची निवड केली आहे. संजीवनीच्या प्रयत्नाने ग्रामिण भागातील अनेक मुला मुलींना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत असल्याने ते आपल्या कुटूंबाचा आधार बनत आहे. तसेच त्यांच्या पगाराचा पैसाही ग्रामीण भागात येत असल्याने ग्रामिण अर्थ कारणाला बळकटी मिळत आहे. दरवर्षी साधारण हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना संजीवनीच्या प्रयत्नातुन नोकऱ्या मिळवुन दिल्या जातात. यामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण असुन पालकांनी संजीवनीवर टाकलेला विश्वास सार्थ ठरत आहे. नोकरी असो, विविध स्पर्धा असो, परदेशातील इंटर्नशिप व एमएस असो, या सर्व आघाड्यांवर संजीवनी आघाडी घेत आहे, यामुळे पालकांचा संजीवनी पॅटर्नवरील विश्वास अधिकाधिक दृढ होत आहे, असे शेवटी म्हटले आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# सहजध्यानाने अध्यात्मिक उंचीबरोबरच सामाजिक उंची वाढते- प्रा. पवार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सहजयोगी पोलीस पाटील श्री अनिल मकोणे रा. मौजे अंमळनेर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर यांची महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील असोसिएशन च्या अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर जिल्हा सहजयोग परिवाराच्या वतीने महाराष्ट्र राज्य प्रचार प्रसार समन्वयक प्रा. नितीन पवार यांचे हस्ते सहज भुवन, गोविंदपुरा, अहिल्यानगर येथे सन्मान करण्यात आले या वेळी अहिल्यानगर जिल्ह्याचे मा. जिल्हा सामन्वयक श्रीनिवास बोज्जा, अमोल यावलकर, घुगरे सर, अशोक तरकसे, रावसाहेब भोपळे बनोटे अप्पा, कुंडलिक ढाकणे व विठ्ठल जाधव, मनोज वाकचौरे अनिल गवळी या वेळी उपस्थित होते. या वेळी बोलतांना प्रा. पवार म्हणाले सहजयोग हा साधारण योग राहिलेला नसून हा योग आज संपूर्ण जगातील १४० देशा पेक्षा जास्त देशातील साधक मोठया प्रमाणात सहजयोग ध्यान साधना करीत असून ही ध्यान साधना केल्यामुळे अध्यात्मिक उंची बरोबर सामाजिक उंची पण वाढते व याचाच प्रत्येय म्हणजे अनिल मकोणे यांची निवड आहे. या वेळी सत्काराला उत्तर देतांना पोलीस पाटील अनिल मकोणे म्हणाले मी गेल्या वर्षभरा पासून सहजयोग ध्यान साधना नित्य नियमाने करीत असून मला सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयकही फायदा झाला असून आज माझी जिल्हा अध्यक्ष पदी निवड म्हणजे प. पु. माताजींनी मला सेवा केल्या बद्दल दिलेला प्रसाद आहे असे ते म्हणाले. कार्यक्रम चे स्वागत कुंडलिक ढाकणे यांनी केले तर आभार प्रदर्शन अभय ठेंगणे यांनी मानले. या वेळी अहिल्यानगर सह संगमनेर, श्रीरामपूर, पाथर्डी, नेवासा, लोणी, राहाता, राहुरी, सुपा सह जिल्ह्यातील सहजयोगी मोठया प्रमाणात उपस्थित होते.



# आनंदयात्री अनंताच्या प्रवासाला निघून गेले - पद्मश्री पोपट पवार

**नगर तालुका । प्रतिनिधी**

माजी आमदार अरुण बलभिम जगताप यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. हिवरेबाजार परिवारातील एक सदस्य आणि हिवरे बाजारच्या कुस्तीवर नितांत प्रेम करणारे होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे हिवरेबाजार परिवाराला अतीव दुःख झाले असून एक आनंदयात्री अनंताच्या प्रवासाला निघुन गेल्याची प्रतिक्रिया पद्मश्री पोपट पवार यांनी दिली. आम्ही हिवरेबाजार परिवार जगताप कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून त्यांना हिवरेबाजार परिवाराच्या वतीने अखेरची भावपूर्ण आदरांजली, असे पवार पुढे म्हणाले.

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा



# शेतकऱ्यांसाठी कृषी कार्यालयाचा थेट व्हॉट्सअॅप टू व्हॉट्सअॅप संवाद

## जिल्ह्यात ५१,००० पेक्षा अधिक फॉलोअर्सचा टप्पा पार

**नगर तालुका । दिपक शिरसाठ**

येथील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी व्हॉट्सअॅप चॅनल सुरू करण्यात आले. या अभिनव उपक्रमामुळे शेतकरी बांधवांना आता घरबसल्या त्यांच्या मोबाईलवरच कृषि विषयक उपक्रम, शासकीय योजना, अनुदान माहिती, यशोगाथा तसेच पिकांच्या नवीन तंत्रज्ञानाची माहिती सहजपणे उपलब्ध होईल. कृषी कार्यालयाने शेतकऱ्यांसाठी थेट व्हॉट्सअॅप टू व्हॉट्सअॅप संवाद सुरू केल्याने शेतकरी बांधव आनंदी झाले आहेत.




शुक्रवारी ता. २ मे रोजी कृषि पर्यवेक्षक विजय सोमवंशी व कृषि सहाय्यक चैतन्य बडवे यांनी मौजे निंबळक व इसळक परिसरात दौरा करत दूध डेअरी, शेतकरी गट कार्यालय, ग्रामपंचायत, सेतु कार्यालय तसेच बियाणे दुकाने याठिकाणी भेट देऊन शेतकऱ्यांना या चॅनलबाबत माहिती दिली आणि प्रत्यक्ष फॉलो करून दिले. यावेळी उद्योजक अजय लामखडे, रावसाहेब गेरंगे, कळसे, दगडू कोतकर, दादा कोतकर, सिताराम ठाणगे, पोपट घाडगे, शिवा खामकर, संभाजी सोनवणे, अतुल दिवटे, अनिल कळसे, सुभाष कोरडे, भाऊसाहेब कोतकर, दादासाहेब खपके आदी शेतकरी बांधव उपस्थित होते.

या उपक्रमासाठी मंडळ कृषि अधिकारी मनिषा घोरपडे यांचे मार्गदर्शन लाभले असून, गावपातळीवरील कृषि सहाय्यक चॅनलची माहिती अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.शेती विभागाशी निगडीत सर्व योजना व प्रकल्पांची माहिती वेळेवर मिळवून आपली शेती अधिक समृद्ध करण्यासाठी सर्वांनीच हा चॅनल फॉलो करावा, असे आवाहन तालुका कृषि अधिकारी विकास पाटील यांनी यावेळी केले.या उपक्रमास शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून आजअखेर जिल्ह्यात ५१,००० पेक्षा अधिक फॉलोअर्सचा टप्पा पार केला आहे. खरीप हंगामात राबवण्यात येणाऱ्या विविध मोहिमा आणि योजनांच्या प्रचाराद्वारे १ लाखांहून अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याचे लक्ष्य जिल्हा कृषी विभागाने ठेवले आहे.सोबत दिलेले स्कॅन करून शेतकऱ्यांनी अहिल्यानगर कृषी विभागाचे चॅनल फॉलो करावे, असे आवाहन रयत समाचार परिवाराने केले आहे.